श्री.एन.एम.जगताप यांना सहाय्यक वन संरक्षक गट -अ (कनिष्ठ श्रेणी) पदावरील पदोन्नतीचा मानीव दिनांक देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र.एमएफएस-२०१९/प्र.क्र.३१/फ-८

मादाम कामा मार्ग,हूतात्मा चौक

मंत्रालय,मुंबई -४०० ०३२.

दिनांक - २ ऑगस्ट, २०१९.

वाचा - १) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एमएफएस-२०१३/५०७/प्र.क्र.१५४/फ-८, दि.२१/०२/२०१४.

२) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एमएफएस-२०१३/५०७/प्र.क्र.१५४ (भाग-१)/फ-८, दि.१६ मे २०१४.

३) मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचा रिट याचिका क्र.२७९७/२०१५ मधील दि.४/०८/२०१७ चा आदेश

४) मा.सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली येथील विशेष अनुज्ञा यचिका क्र. २४३०६ /२०१७.

५) शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एमएफएस-२०१९/प्र.क्र. ४/फ-८, दि.७ मार्च २०१९.

६) अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (कार्मिक) नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष.५/आस्था/प्र.क्र.४८(१०-११) १०८४/१८-१९ दि.१२/०२/२०१९.

प्रस्तावना -

अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), नागपूर यांचे पत्र कक्ष-१०-(अ)२/आस्था/जे.या./प्र.क्र.२४/१३/१४/४८६, दि.२८/०८/२०१३ अन्वये वनक्षेत्रपाल, गट-ब या संवर्गाची दि.०१/०१/२००९ ते दि.०१/०१/२०१२ ची अंतिम जेष्ठता यादी प्रसिद्ध करण्यात आली असून यामध्ये श्री.एन.एम.जगताप, तत्का. वनक्षेत्रपाल यांचा जेष्ठता क्र. ६०९ तसेच श्री.असलम हजमा मुल्ला यांचा जे.क्र.६१४ असा नमूद करण्यात आलेला आहे.

वनक्षेत्रपाल, गट-ब या संवर्गातील अधिकाऱ्यांना सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गामध्ये पदोन्नती करीता सन २०१३-१४ ची निवडसूची तयार करण्यासाठी दि.१३/१२/२०१३ रोजी पार पडलेल्या विभागीय चौकशी समितीच्या बैठकीच्या वेळी, यवतमाळ वनक्षेत्रात चंदन वृक्षाच्या अवैध वृक्षतोडीमुळे झालेल्या नुकसानीस जबाबदार धरून श्री.एन.एम.जगताप यांच्या विरूद्ध महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चा नियम १० नुसार विभागीय चौकशी सुरू करण्यात होती. त्यामुळे त्यांच्या पदोन्नती आदेश निर्गमित न करता, त्यांचे प्रकरण मोहरबंद लिफाफ्यात ठेवण्यात आले होते व खुल्या प्रवर्गामध्ये त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेले श्री.असलम हजमा मुल्ला यांना शासन निर्णय, महसूल व वन विभाग संदर्भ क्र.-१ दि.२१/०२/२०१४ अन्वये सहायक वनसंरक्षक (गट-अ) (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गामध्ये पदोन्नती देण्यात आली आहे.

मुख्य वनसंरक्षक (प्रादे.) यवतमाळ यांनी श्री.एन.एम.जगताप यांच्या विरुध्द सुरु असलेल्या विभागीय चौकशी प्रकरणी दि.२१/०३/२०१४ अन्वये अंतीम आदेश पारित केले असून, श्री.जगताप यांना ताकीद देऊन दोषमुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे श्री.एन.एम.जगताप यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेले परंतू त्यांच्या अगोदर सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गामध्ये पदोन्नत झालेले श्री.असलम हजमा मुल्ला यांच्या पदोन्नतीचा दिनांक दि.२१/०२/२०१४ ही मानीव तारीख मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी रिट याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये दि.२५/०५/२००४ चा शासन निर्णय रद्द करून पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा.उच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयास स्थगिती देण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाच्यावतीने मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२४३०६ / २०१७ मधील अंतरीम / अंतिम निर्णयाच्या अधीन राहून तसेच सहायक वनसंरक्षक संवर्गाची सन २०१३-१४ ची निवडसूची नियमित करण्याच्या अधीन राहून, श्री.एन.एम.जगताप यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेले परंतू त्यांचे अगोदर सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गामध्ये पदोन्नत झालेले श्री.असलम हजमा मुल्ला यांच्या पदोन्नतीचा दिनांक दि.२१/०२/२०१४ ही मानीव तारीख मंजूर करण्यात येत आहे.

२. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग संदर्भ क्र.५, दिनांक ०७/०३/२०१९ अन्वये सहा.वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या संवर्गाची दिनांक ०१/०१/२०१९ अंतिम जेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आली. सदर जेष्ठता यादीमध्ये श्री.एन.एम.जगताप यांचे नाव श्री.राजेंद्र वसंत गौपाल (जे.क्र.२१०) यांच्यानंतर व श्री.असलम हजमा मुल्ला यांच्या वर जेष्ठता क्रमांक २१० - अ असे राहील.

३. श्री.एन.एम.जगताप यांना सहायक वनसंरक्षक, गट-अ (कनिष्ठ श्रेणी) या पदावरील दि.२१/०२/२०१४ हा मानीव दिनांक केवळ जेष्ठतेसाठी प्रदान करण्यात येत आहे.

४. वनसंरक्षक, यवतमाळ यांचे आदेश दि.०७/०९/२००२ अन्वये श्री.एन.एम.जगताप यांना आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पहिला लाभ (सहाय्यक वनसंरक्षक या वरीष्ठ पदाची वेतनश्रेणी) दि.०१.०१.२००२ पासून लागू करण्यात आला आहे. तसेच उपसंरक्षक,पांढरकवडा वन विभाग यांचे आदेश दि.१७/१२/२०१५ अन्वये श्री.एन.एम.जगताप यांना आश्वासित प्रगती योजनेतंर्गत दुसरा लाभ (विभागीय वन अधिकारी पदाची वेतनश्रेणी) दि.०१.०१.२०१४ पासून मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे श्री.एन.एम.जगताप यांना मानीव दिनांक मंजूरीच्या अनुषंगाने पुन्हा वेतन निश्चिती करण्यात येणार नाही तसेच त्यांना कोणतीही थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही.

५. हे आदेश संबंधित वर्षाच्या निवडसुचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता प्राप्त होण्याच्या अधीन तसेच सामान्य प्रशासन विभाग अनौ.संदर्भ क्र.६४३/का.१२ दि.१४/०६/२०१९ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१९०८०२१७०७५५०४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Niwrutti Dhas

Digitally signed by Anil Niwrutti Dhas
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=699d21cc89897191099434d443603426329c81b1b292ed2d168c892811118cc7, serialNumber=f85f1c64c05886c8d514e40d54d27ff3a80ffd907a05433b1c412b7f7ffa0afd, cn=Anil Niwrutti Dhas
Date: 2019.08.02 17:18:09 +05'30'

(अनिल धस)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर.

३. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (प्रशासन - दुय्यम संवर्ग), नागपूर
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), यवतमाळ .
५. महालेखापाल,महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता),महाराष्ट्र २,नागपूर
६. जिल्हा कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, यवतमाळ
७. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
८. मा.राज्यमंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
९. सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक
१०.संबंधित अधिकारी / प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), म.रा.नागपूर यांचे मार्फत
११.निवड नस्ती (फ-८ कार्यासन).